महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः कअनि १११४/प्र.क्र.८०/१४ ब ,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: २० नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

सा.प्र.वि.आदेश क्र.कअनि १११४/प्र.क्र.८०/१४ ब , दिनांक २६.०८.२०१४ व दिनांक १९.११.२०१६

आदेश :-

संदर्भाधीन दिनांक २६.०८.२०१४ च्या आदेशान्वये श्री.भ.रा.लांघी, कक्ष अधिकारी, विधि व न्याय विभाग, यांच्या सेवा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालय , सांस्कृतिक कार्य संचालनालय , पुणे या कार्यालयातील कार्यक्रम अधिकारी या पदावर दोन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. श्री.भ.रा.लांघी, कक्ष अधिकारी, हे कार्यक्रम अधिकारी, विभागीय कार्यालय , सांस्कृतिक कार्य संचालनालय , पुणे या पदावर दिनांक १६.०९.२०१४ पासून प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत.

२. श्री.भ.रा.लांघी, कक्ष अधिकारी, यांचा प्रतिनियुक्तीचा दोन वर्षाचा कालावधी दिनांक १५.०९.२०१६ रोजी संपुष्टात आल्याने संदर्भाधीन दिनांक १९.११.२०१६ च्या आदेशान्वये त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीस एक वर्ष म्हणजेच दिनांक १५.०९.२०१७ पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १४.०९.२०१७ रोजी पूर्ण झाला आहे.

३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दिनांक २७.०९.२०१७ रोजीच्या टिप्पणीद्वारे श्री.भ.रा.लांघी, कक्ष अधिकारी, यांच्या प्रतिनियुक्तीस विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्याची या विभागास विनंती केली आहे. त्यानुसार श्री.भ.रा.लांघी, कक्ष अधिकारी, यांच्या कार्यक्रम अधिकारी, विभागीय कार्यालय , सांस्कृतिक कार्य संचालनालय , पुणे या पदावरील प्रतिनियुक्तीच्या कालावधीस एक वर्ष म्हणजेच दिनांक १४.०९.२०१८ पर्यत या आदेशान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२०१५१८४७५१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2017.11.20 15:22:49 +05'30'

(इ.मु.काझी)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.भ.रा.लांघी, कक्ष अधिकारी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई, (संबंधित मंत्रालयीन विभागांमार्फत)

प्रत,

१. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग , मंत्रालय ,मुंबई .

३. सह सचिव / उप सचिव (आस्थापना) , पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. सह सचिव / उप सचिव (आस्थापना) , विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय , जुने सचिवालय , विस्तार भवन, पहिला मजला , महात्मा गांधी मार्ग , मुंबई ४०००३२.

६. विभागीय कार्यालय , सांस्कृतिक कार्य संचालनालय ,पुणे.

७. निवड नस्ती / संग्रहार्थ १४ ब